मुंबई विद्यापीठ

विद्यार्थी कल्याण विभाग

क्र.वि.क/०३/२०१७

डॉ. सुनिल पाटील
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट
मुंबई - ४०० ०२०

परिपत्रक ः

संदर्भ क्र.शासन निर्णय - संकीर्ण २०१६/प्र.क्र.६८३/१६/विशि - ३, दिनांक १५ मे, २०१७

मुंबई विद्यापीठाशी संलंग्नित असलेल्या मुंबई विभागातील सर्व महाविद्यालये, संस्था आणि विभागांना सुचित करण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडुन प्राप्त झालेल्या निर्देशानुसार भारतीय संविधनाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेड ए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणामध्ये घेण्याची सर्वस्वी जबाबदारी राज्य निवडणुक आयोगाची आहे व त्यासाठी राज्य निवडणुक आयोगाने दिलेले आदेश सर्वावर बंधनकारक आहेत. तरी, मुंबई विद्यापीठाशी संलंग्नित सर्व महाविद्यालये, संस्था आणि विभागांनी खालील आदेश पाळावेत व संदर्भातील कार्यपुर्ती अहवाल विद्यापीठाकडे deptstudentswelfare@gmail.com या ईमेलवर पाठवावा.

१. (i) राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, तंत्रशिक्षण संस्था, इत्यादी यांनी प्रथम् वर्षात प्रवेश घेणा-या सर्व मुला/मुलींकडून खालील आशयाचे प्रमाणपत्र/ हमीपत्र घेण्याबाबत प्रवेशअर्जामध्ये योग्य ती सुधारणा करावी.

"मी दिनांक ०१/०१/........ रोजी १८ वर्षाचा/वर्षाची झालो/झाले आहे किंवा होणार आहे.१८ वर्षे पुर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवुन घेणार आहे अशी मी प्रतिज्ञा करतो/करते. यासाठी सोबत जोडलेला नमुना ६,७,८ व ८अ व्यवस्थितपणे भरलेला आहे."

(ii) प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यानी त्यांच्याकडील एका योग्य प्राध्यापकांना या कामासाठी नोडल अधिकारी हणुन नेमावे. त्यांनी सर्व मुला/मुलींकडून आवश्यकतेप्रमाणे नमुना क्रमांक ६,७,८ व ८अ गोळा करावेत.सदर फॉर्म संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी यांच्याकडून घ्यावेत.

(iii) नोडल अधिकारी यांनी वरील भरलेले सर्व फॉर्म कमीत कमी वर्षातुन दोन वेळा संबंधित जिल्हाधिकारी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करावेत व पोचपावती घ्यावी.

(iv) मतदार नोंदणी अधिकारी यांनी वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या सर्व अर्जावर (६,७,८ व ८अ)कालबध्द पद्धतीने कार्यवाही करून योग्य तो निर्णय घ्यावा व मतदार यादीत तशी दुरूस्ती करावी. त्याबाबतची खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी.

(v) मतदार यादीत नाव नोंदविलेल्या सर्व मुले /मुलींना जिल्हाधिकारी यांनी त्वरीत ओळखपत्र दयावे. त्वरीत देणे शक्य नसल्यास वरील ओळखपत्रांचे वाटप दरवर्षी भारत निवडणुक आयोगाद्वारे दिनांक २५ जानेवारी रोजी साज-या होणा-या "राष्ट्रीय मतदार दिनाच्या" दिवशी करण्यात यावे.

(vi) संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य व नोडल अधिकारी यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याबरोबर समन्वय साधुन ही प्रक्रिया बिनचुक राबविण्याची जबाबदारी उचलावी.

तरी, मुंबई विद्यापीठाशी संलंग्नित सर्व महाविद्यालये, संस्था आणि विभागांनी निवडणूक आयोगाची सदर महत्वाची बाब लक्षात घेवून आवश्यकती अंमलबजावणी करावी व आपला कार्यपुर्ती अहवाल त्वरीत वर उल्लेख केलेल्या ई मेलवर पाठवावा.

(डॉ. सुनिल पाटील)
संचालक, विद्यार्थी विकास विभाग

दिनांक ः ०२ जुन, २०१७